दिनांक :– ०१.०६.२०२१

**प्रेसनोट**

**लोकसेवक श्री पांडुरंग माचेवाड, तहसिलदार, तहसिल कार्यालय हिंगोली यांनी ३,००,०००/–रू. ची लाचेची मागणी केल्याने त्याचे विरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

---

पिडीत तक्रारदार यांनी दिनांक २५.०५.२०२१ रोजी तक्रार दिली होती की, त्यांनी भाडयाने घेतलेले पाच टिप्पर मागील विस पंचविस दिवसापुर्वी रेतीची वाहतुक करीत असतांना हिंगोली पोलीसांनी पकडुन पोलीस स्टेशनला लावुन मा.तहसिलदार, हिंगोली यांना पत्रक देवुन पुढील कार्यवाही करणे बाबत कळविले होते. त्यावरून तक्रारदार मा.तहसिलदार हिंगोली यांना जावुन भेटले असता रेतीच्या पकडलेल्या पाच हि टिप्परची लवकर कार्यवाही करून लवकर सोडण्यासाठी व मागील महिन्याचे रेतीचे टिप्परवर कार्यवाही न करण्यासाठी राहिलेले पैसे असे मिळुन ३,००,०००/– रू लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार दिली होती.

त्यावरून दिनांक २५.०५.२०२१ रोजी तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी करण्यात आली असता लोकसेवक माचेवाड, तहसिलदार, तहसिल कार्यालय हिंगोली यांनी तक्रारदार यांना ३,००,०००/– रू. ची लाच स्विकारण्याची सहमती दिली.

त्यावरून लोकसेवक माचेवाड, तहसिलदार तहसिल कार्यालय हिंगोली यांचे विरूध्द पोलीस स्टेशन हिंगोली शहर गुरन 152/२०२१ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच पुढील कारवाई सुरू आहे.

ही कामगिरी मा. श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, मा. श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधिक्षिक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधीक्षक श्री निलेश सुरडकर, पोहेकॉ श्री विजय उपरे, पोना श्री तान्हाजी मुंढे, पोना श्री विनोद देशमुख, पोना श्री ज्ञानेश्वर पंचलिंगे, पोशि श्री अविनाश किर्तनकार, पोशि प्रमोद थोरात चापोना श्री सरनाईक अॅ.क.ब्युरो कार्यालय हिंगोली यांचे मदतीने यशस्वीपणे केलेली आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी अॅन्टी करप्शन ब्युरो मार्फत मोबाईल अॅप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

**टोल फ्री क.–१०६४**, दुरध्वनी क.०२४५६–२२३०५५,
**मोबाईल कमांक :– ९८२२२००९५९**

**पोलीस उप अधिक्षक**
**अॅन्टी करप्शन ब्युरो हिंगोली**